# जनसंपर्क अधिकारी


मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ४७-२३ दिनांक :- ०९/०२/२०२३

## पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेवुन केलेल्या खुनाच्या अरोपीतास अटक
## विरार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक ०१/०२/२०२३ रोजी १४.०० वा. चे सुमारास रुम नं. ए १०२, जय जिवदानी अपार्टमेंट, शंकर पाडा, नारंगी बायपास रोड, विरार पुर्व येथुन घाण वास येत असल्याची माहिती विरार पोलीस ठाण्यास फोनदवारे मिळताच मिळालेल्या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता त्याठिकाणी एक अंदाजे २५ ते ३० वर्षे वयोगटातील एका महिलेचे प्रेत दिसुन आले. सदरबाबत विरार पोलीस ठाणेत अकस्मात मृत्यु रजि. नं. २४/२०२३ क्रि. प्रो. को. कलम १७४ अन्वये नोंद करण्यात आला होता. नमुद ठिकाणी मयत झालेल्या महिलेचे नाव पिंकी ऊर्फ प्रियंका वैभव पाटील असून तिचा घातपाताने मृत्यु झाला असावा या संशयाने प्रेतावर वैद्यकिय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, विरार पश्चिम यांनी पोस्टमार्टम केले होते. परंतु मृत्युचे नक्की कारण समजण्यासाठी प्रेत मा. प्राध्यापक विभाग प्रमुख, न्याय वैद्यकिय शास्त्र विभाग, जे.जे. रुग्णालय, भायखळा, मुंबई ( ॲनॉटॉमी ) येथे पाठविण्यात आले असता तिचा गळा दाबुन मृत्यु झाला असल्याचा स्पष्ट अभिप्राय मिळाल्याने सदरबाबत पो.उ.नि. विनोद वाघ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा रजि. नं. १२२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३०२ प्रमाणे अज्ञात आरोपीविरुध्द दि. ०२.०२.२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून वरिष्ठांनी सदर गुन्हा उघडकीस आणण्याबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सूचना देवून गुन्हयाची लवकरात लवकर उकल करण्याकरीता वेगवेगळया टिम तयार केल्या. गुन्हयाच्या घटनास्थळ व त्याच्या आजुबाजूच्या परिसरातील जवळपास १०० हून अधिक सी.सी.टि.व्ही.ची तपासणी करण्यात आली. परतुं, गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पोलीस तपास पथकास तपासाच्या अनुषंगाने काहीएक धागेदोरे हाती लागले नाहीत. म्हणून तपास पथकाने मयताचा पती वैभव बाळाराम पाटील, रा. मानिवली, पो. दुगाड, ता.भिवंडी, जि. ठाणे याचे आई-वडील, बहिण-भाऊ यांच्याकडे विचारपुस केली असता त्यांच्याकडूनही वैभव पाटील याच्या ठावठिकाणाबाबत व गुन्हयाच्या उकलीबाबत काहीएक उपयुक्त माहिती मिळून आली नाही. तांत्रीक माहितीच्या आधारे तसेच त्याच्या नातेवाईकांकडे केलेल्या चौकशीत वैभव पाटील याचा बाजपणाचा मित्र संकेत रमेश राउत असून तो सध्या रा. विरार येथे राहत असल्याची माहिती समोर आल्याने संकेत राउत याच्याकडे कसुन व कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने वैभव पाटील याने त्याच्या पत्नीचे चारित्र्य ठिक नसल्याने तिस जिवे ठार मारावयाचे आहे असे सांगितले व दोघांनी मिळून तिची हत्या केल्याचे सांगितल्याने नमूद गुन्हयात त्याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक ०३/०२/२०२३ रोजी अटक करण्यात आले. नमूद गुन्हयातील आरोपी वैभव पाटील हा खडवली, टिटवाळ खडवली येथील भातसा नदीच्या पुलावर, कल्याण परिसरात असल्याचे तांत्रिक विश्लेषणावरुन समजुन आल्याने सदर परिसरात दिवस-रात्र सापळा लावून भातसा नदी पूल, खडवली येथून ताब्यात घेण्यात येवून त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने दिनांक ०५/०२/२०२३ रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदरच्या गुन्हयाचा पुढील तपास पो. नि. विठ्ठल चौगुले हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ विरार तथा अति. कार्यभार परिमंडळ २, श्री. रामचंद्र देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, विरार विभाग, श्री. राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. दिलीप राख, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पोलीस निरीक्षक, श्री. विठ्ठल चौगुले (प्रशासन) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेतील स.पो.नि. रुपेश दळवी, पो.उ.नि. संदेश राणे, तसेच पो.हवा. सचिन लोखंडे, संदीप जाधव, संदिप शेरमाळे, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, पो.अं. रवी वानखेडे, सुनिल पाटील,

युवराज वाघमोडे, सचिन ओलेकर, सागर घुगरकर, दत्तात्रय जाधव तसेच परिमंडळ ०३ कार्यालयातील  अनिल शेलार, नामदेव ढोणे  यांनी केली आहे.

-----ooo-----